# सांस्कृतिक मूल्य, पारंपरिक वारसा आणि नव शिक्षण धोरण २०२०

**डॉ . सुनंदा बोरकर**
सहायक प्राध्यापक,
कमला नेहरू महाविद्यालय, नागपूर.
मोबा. ८७६६४२२४७५
sunandaj205@gmail.com

.....................................................................................................................

**गोषवारा -**

अन्न, वस्त्र, निवारा या माणसाच्या मूलभूत गरजा आहेत. आता या गरजांमध्ये शिक्षणाचाही अंतर्भाव केला गेला आहे. शिक्षण घेतलेला मनुष्य अन्न, वस्त्र, निवारा या आपल्या गरजांच्या पूर्तीसाठी सक्षम होतो. हे शिक्षण या देशातील प्रत्येक व्यक्तीला मिळावे हेच नवे शैक्षणिक धोरण २०२० चे उद्दिष्ट आहे. १८५४ चा वूड्सअहवाल, १८८२ चा हंटर अहवाल, १९०२ चा रैली आयोग हे या देशाचे शैक्षणिक धोरण ठरविणारे आयोग होते. भारत स्वतंत्र झाल्यानंतर राधाकृष्णन आयोग, कोठारी आयोग या दोन आयोगांनी केलेल्या शिफारशीनुसार आपल्या देशातले शैक्षणिक धोरणांची आखणी झाली होती. १९८६ च्या शिफारशींनंतर तब्बल ३४ वर्षांनी डॉ. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली एका आयोगाची स्थापना करून शैक्षणिक धोरण आखण्यात आले आहे. यालाच 'नवे शैक्षणिक धोरण २०२०' असे संबोधण्यात येते.

देशात शिक्षितांचा टक्का वाढत असला तरी गुणवत्तेच्या बाबतीत प्रचलित शिक्षण व्यवस्थेत काही उणिवा आहेत. इंग्रजी भाषेतून शिक्षणाला अवाजवी महत्त्व दिले जात आहे. आपल्या पाल्याने स्पर्धेत टिकून राहावे म्हणून प्रत्येक पालक आपल्या पाल्याला इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधून शिक्षण देतो आहे. बालकांच्या मानसिक विकासासाठी, तसेच क्लिष्ट संकल्पना स्पष्ट होण्यासाठी मातृभाषेतून शिक्षण दिले गेले पाहीजे हे आधुनिक मानसशास्त्राने मान्य केले आहे. त्यामुळे नवीन शैक्षणिक धोरणात मातृभाषेतून शिक्षणाला प्राधान्य दिले आहे गेले आहे. त्याचबरोबर सांस्कृतिक मूल्ये आणि पारंपरिक वारशाचे शिक्षण देण्याचे निश्चित केले आहे.

**बीजशब्द** -शिक्षण, विद्यार्थी, धोरण, संस्कृती, परंपरा.

**प्रस्तावना -**

विद्यार्थी हे देशाचे भवितव्य असतात. त्यांना काळानुरूप शिक्षण दिले तरच देशाचे भवितव्य उज्वल होऊ शकते. जागतिकस्तरावर विकसित झालेल्या राष्ट्रांनी विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर दिलेला भर त्यांच्या प्रगतीच्या मार्गाचे प्रवेश द्वार ठरला आहे. आपल्या देशाच्या विद्यमान सरकारने ही वर्तमान शिक्षण धोरणात बदल घडवून नवीन शैक्षणिक धोरणाला मंजुरी दिली आहे. हे धोरण आखण्यासाठी एक समिती गठीत करण्यात आली होती. एकविसाव्या शतकातील दोन दशके उलटून गेल्यानंतर २०२० मध्ये या शैक्षणिक सुधारणा सादर करण्यात आल्या आहेत. ३० जुलै २०२० रोजी विद्यमान मंत्रिमंडळाने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला मान्यता दिली आहे. हे धोरण २०२२ पासून लागू होणार आहे.

**संशोधन पद्धती -**

प्रस्तुत लेखन वर्णनात्मक स्वरूपाचे असून दुय्यम सामग्रीवर आधारलेले आहे. यात संदर्भ ग्रंथ, वर्तमान पत्र, लेख, इंटरनेटचा समावेश करण्यात आला आहे.

**संशोधनाचा उद्देश -**

१) नवे शैक्षणिक धोरण २०२० समजून घेणे

२) सांस्कृतिक मूल्य आणि परंपरेचा वारसा धोरणाच्या अनुषंगाने तपासून पाहणे.

**गृहितकृत्य -**

आपल्या देशाला सांस्कृतिक मूल्यांची आणि पारंपरिक वारश्यांची देणगी लाभली आहे.

**परिवर्तन सृष्टीचा नियम -**

परिवर्तन हा सृष्टीचा नियम आहे. जरठ झालेली, पिवळी पडत आलेली पानं टाकून देत झाडे नव्या पालवीचे स्वागत करतात. खळखळ वाहणाऱ्या नद्या कायम गतिमान असतात म्हणूनच त्यांचे पाणी निर्मळ, शुद्ध असते. अफाट सागर लाटांमागून लाटांनी किनाऱ्याकडे झेपावत साचलेपण नाकारतो. प्राणी –पक्षी आणि सारे सजीव निसर्गातला बदल स्वीकारत स्वतःच्या अस्तित्वासाठी धडपडतात. डार्विनचा उत्क्रांतीवाद हा बदलाचेच गीत गातो. आपली धराही गतिमान आहे. एवढेच नव्हे तर संपूर्ण अंतराळालाही एक गती आहे. परिवर्तन, परिवलन, परिभ्रमण या मुळे ग्रहताऱ्यांचे अस्तित्व टिकून आहेत. प्रचंड तप्त वायूंचा गोळा असणारी पृथ्वी ही परिवर्तनामुळेच सजीवांच्या रहिवासास योग्य भूमी ठरली आहे. प्रत्येकाला गती आहे म्हणून अस्तित्व आहे.

'कायदा पाळा गतीचा
काळ मागे लागला
चालणाऱ्या वाट सापडे
थांबला तो संपला'

या कवी वचनाप्रमाणे बदल स्वीकारत गतिमान होणे हेच प्रगतीचे पाऊल असते. भारताने 'नवे शैक्षणिक धोरण २०२०' या महत्त्वपूर्ण प्रकल्पाअंतर्गत शिक्षण क्षेत्रात बदल घडवून आणण्याचा निर्णय घेतला आहे.

**भारतामधील वेगवेगळे शिक्षण धोरण -**

भारतीय लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी भारत सरकारने वेळोवेळी शैक्षणिक धोरणे राबविली आहेत. १९६४ साली कोठारी आयोगाच्या शैक्षणिक शिफारशी सादर झाल्या. त्याची अंमलबजावणी १९६८ पासून करण्यात आली. १०+२+३ हा पॅटर्न आणि त्रिभाषा सूत्र हेया समितीने सुचविल्यानुसार लागू करण्यात आले होते. या मध्ये प्रथम भाषा मातृभाषा, द्वितीय भाषा राष्ट्रभाषा (हिंदी), तृतीय भाषा म्हणून इंग्रजीचा स्वीकार करण्यात आला होता. सर्वसाधारणपणे याच शिफारशींवर आधारित १९८६ मध्ये दुसरे शैक्षणिक धोरण राजीव गांधी सरकारने मांडले. या धोरणामध्ये विशेषतः भारतीय महिला, अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीसाठी असमानता दूर करण्याच्या उद्देशाने शैक्षणिक सुविधांवर विशेष भर दिला गेला. या धोरणांमध्ये १९९२ ला नरसिंहराव सरकारने बदल सुचविला आणि काही सुधारणा करण्यात आल्या. सहा ते चौदा वयोगटातील सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण देण्यासाठी राईट ऑफ एज्युकेशन (आरटीई) २००९ मध्ये लागू करण्यात आला. या अधिनियमांतर्गत सर्व शिक्षा अभियान, मध्यान्ह भोजन योजना, नवोदय विद्यालय, केंद्रीय विद्यालय या सारख्या सरकारी उपक्रमास समाजातील वंचित घटकांसाठी २५ टक्के आरक्षण देण्यात आले आहे. या शैक्षणिक धोरणानुसार आजवर शैक्षणिक कार्य चालत आले आहे.

२०१५ मध्ये स्मृती इराणी मनुष्य बळ विकास मंत्री होत्या. त्यांनी नव्या शैक्षणिक सुधारणा मान्य करण्याच्या दृष्टिकोनातून आक्टोबर २०१६ मध्ये धोरण मांडले. यावर जनतेकडून सुधारणा मागवण्यात

आल्या. मात्र हे धोरण मंजूर होऊ शकले नाही. या धोरण निर्मितीचे प्रमुख एस. आर. सुब्रमण्यम होते. २०२० साली पुन्हा दुसरा प्रयत्न ईस्रोचे माजी अध्यक्ष के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी बसवून करण्यात आला. या धोरणांतर्गत मनुष्य बळ विकास मंत्रालयाचे नाव बदलून शिक्षण मंत्रालय करण्यात आले. शालेय शिक्षणातील गुणवत्तेमध्ये वाढ करण्यासाठी नवनवीन उपक्रम राबविण्याची सूचना या धोरणात करण्यात आली आहे. शालेय शिक्षणासाठी ५+३+३+४ या रचनेवर आधारित बौद्धिक विकास व अध्यापनाच्या तत्त्वांवर आधारित अभ्यासक्रम व अध्यापन शास्त्र विकसित करण्यात आले आहे. शिक्षक होण्यासाठी चार वर्षाचा बॅचलर ऑफ एज्युकेशन हा अभ्यासक्रम ठरविण्यात आला आहे. दुय्यम दर्जाचे व कार्यक्षम शिक्षक आणि शिक्षण संस्था बंद करण्यात येतील व संशोधनाच्या कल्पना वेगाने देशभर विकसित व्हाव्यात यासाठी नॅशनल रिसर्च फाउंडेशनची स्थापना करण्यात येईल. या धोरणाच्या माध्यमातून सर्वच भारतीय भाषांचे संवर्धन, जतन आणि वृद्धी करण्याचा प्रयत्न केला जाईल. विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या वयोगटात वर्गवारी करून अभ्यासक्रमाची मांडली जाईल. या प्रणालीमध्ये तीन वर्षांच्या मुलांचे अंगणवाडीचे शिक्षण जे पूर्वी मुख्य शिक्षणाच्या टप्प्यात घेतले जात नव्हते ते घेतले जाईल. दहावी, बारावीचे बोर्ड काढून शिक्षण प्रक्रिया सुलभ केली जाईल. इयत्ता सहावी पासून इंटर्शिपसह व्यावसायिक शिक्षणाची तरतूद केली जाईल. मातृभाषेतून शिक्षणावर भर दिला जाईल कोणत्याही विद्यार्थ्यावर कोणतेही भाषा कठोरपणे लादली जाणार नाही. एनसीईआरटीशी सल्ला मसलत करून राष्ट्रीय शिक्षण परिषदद्वारा कार्यक्रम आखला जाईल. एम. फील. चाअभ्यासक्रम बंद केला जाईल.

उच्च शिक्षणात 'नवीन शैक्षणिक धोरण २०२० चे कार्यान्वयन' या विषयावरील चर्चेत बोलत असताना राष्ट्रपती रामनाथ कोविंद म्हणाले की, 'हे शिक्षण धोरण सार्वत्रिकता आणि उत्कृष्टता हा दुहेरी उद्देश पूर्ण करण्याचा प्रयत्न करणार आहे. एकविसाव्या शतकाच्या गरजांना पूर्ण करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. एकसमता मूलक, चैतन्यमय, शिक्षित समाज विकसित करण्याचा या धोरणाचा प्रयत्न राहणार आहे. आत्मनिर्भर भारत बनविण्यासाठी या धोरणाची महत्त्वपूर्ण भूमिका असणार आहे. पारंपरिक मूल्य आणि नवाचाराला प्रोत्साहन देण्याचा प्रयास या धोरणाद्वारे केला जाणार आहे. तक्षशिला, नालंदा या भारतीय विद्यापीठांना मिळालेला जागतिक दर्जा पुन्हा भारतीय विद्यापीठांना मिळवण्याचा प्रयत्न या धोरणानुसार केला जाणार आहे.' राष्ट्रपतींच्या या वक्तव्यानुसार हे नवीन शैक्षणिक धोरण जागतिकीकरणात भारताची महत्त्वपूर्ण भूमिका ठरवणारे असणार आहे.

**आपली संस्कृती आणि परंपरा -**

आपल्या देशाला परंपरेचा उज्वल वारसा लाभला आहे. तक्षशीला, नालंदा, विक्रमशिला, वल्लभी ही आपल्या देशातील प्राचीन विद्यापीठे जगविख्यात होती. नव्या शैक्षणिक धोरणाचा आराखडा मंजूर झाला आहे. मात्र या प्रत्येक टप्प्यावर अभ्यासक्रम कसा राहील याची पद्धतशीर आखणी करण्याचे काम सुरू आहे. आपल्या देशाचा प्राचीन वारसा जतन करणे हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे त्याचबरोबर या प्राचीन वारश्यामधून चिरंतन, शाश्वत अशी मूल्ये आत्मसात करुन नव्या पिढीला घडविण्याचे काम हे या धोरणात नमूद केले आहे. नालंदा, तक्षशिला येथील विद्यापीठ प्राचीन काळी जागतिक दर्जाची होती. येथे शिक्षण घेण्यासाठी संपूर्ण जगभरातून विद्यार्थी येत असत. प्राचीन चिनी प्रवासी ह्यू-एन-त्संग यांनी या विद्यापीठात अध्ययन केले होते. ते पंधरा वर्षे भारतात राहिले. अध्ययनानंतर याच विद्यापीठात त्यांनी अध्यापन केल्याचा उल्लेखही सापडतो. त्यांनी केलेल्या प्रवास वर्णनात नालंदा विद्यापीठाची माहिती मिळते. या विद्यापीठात ऐंशी सभागृहे होती. सर्व सोयी सुविधा पुरविणारी वसतिगृहे होती. अति भव्य आणि सुसज्ज ग्रंथालय होते. या ग्रंथालयाच्या इमारती अनेक मजली होत्या. या विद्यापीठात भव्य क्रीडांगणे होती. येथील शिक्षणाचा दर्जा उच्च कोटीचा होता. यात तत्त्वज्ञान, साहित्य, तर्कशास्त्र, धर्मशास्त्र, योगविद्या, व्याकरण मीमांसाशास्त्र इत्यादी विषयांचा अभ्यास होत असे. हिंदू, बौद्ध, जैन धर्माचे तत्वज्ञान या विद्यापीठात शिकवले जात होते. गणित, शास्त्र, स्थापत्यशास्त्र अशा विविध विषयांवरच्या अध्यापनाला येथे प्राधान्य होते. आपल्या या सुवर्ण इतिहासाची नोंद घेत नव्या शैक्षणिक धोरणात अभ्यासक्रमाची पुनर्मांडणी करताना या सर्व बाबींचा विचार करणे गरजेचे आहे. आजच्या काळात उपयुक्त ज्ञानाचा समावेश नव्या

अभ्यासक्रमात केला तरच देशाच्या प्रगतीच्या दृष्टीने उपयोगाचे ठरणार आहे. कालबाह्य वाटणारे विचार सोडून शाश्वत, चिरंतन उपयोगाचे शिक्षण विद्यार्थ्यांना देण्यासाठीचा अभ्यासक्रम तयार करावे अशी अपेक्षा सर्व वर्गातून होत आहे.

प्राचीन वर्ण व्यवस्थावादी संस्कृतीमध्ये शिक्षणासाठी गुरुकुल पद्धती अस्तित्वात होती. या पद्धतीमध्ये विद्यार्थ्यांना गुरूगृही राहून शिक्षण घ्यावे लागायचे. येथे या विद्यार्थ्यांना धर्म, तत्वज्ञान, युद्ध कौशल्य, तर्कशास्त्र, मीमांसा, चित्रकला, शिल्पकला, संगीत, गणित, भाषा, स्थापत्य इत्यादी विषय शिकवले जात. या गुरुकुल पद्धतीमधील काही चांगल्या बाबींचा नव्या अभ्यासक्रमात समावेश करता येईल; पण या गुरुकुल पद्धतीचा आजच्या काळात त्या अनुषंगाने विचार करताना बरेच मतभेद होण्याची शक्यता आहे. कारण शिक्षणपद्धतीचा पायाच चातुर्वर्ण्य पद्धतीवर आधारलेला आहे. या पद्धतीत सर्वांना शिक्षणाची समान संधी दिली गेलेली नाही. वर्णव्यवस्था आज संपूर्णपणे नाकारली गेली आहे. नवे शैक्षणिक धोरण तळागाळातील वंचितांचा शोध घेऊन त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयास करणारे असणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकसित करण्यावर भर देण्यात येणार आहे.

आपल्या भारत देशात आदिवासी, वनवासी डोंगरदऱ्यात, नदी खोऱ्यात राहणारे लोकसमूह आहेत. बऱ्याच समुहापर्यंत शिक्षण अजून पोहोचले नाही. प्रत्येक गावात, पाड्यात शाळा नेणे ही शिक्षण धोरणाचे उद्दिष्ट ही असावे. त्याच बरोबर इमारत, इतर सुविधा, प्रशिक्षित शिक्षक वर्ग आणि तो ही विद्यार्थ्यांच्या भवितव्याची जाण असणारा ही काळाची गरज आहे. शिक्षणाचे बाजारीकरण झाले आहे. ते टाळून शिक्षकाला त्याच्या कर्तव्याची जाणीव करून देणारे प्रशिक्षण प्रथम शिक्षकाला द्यावे लागणार आहे. नव्या शैक्षणिक धोरणाने याचा ही विचार केलेला दिसून येत आहे.

**नवे शैक्षणिक धोरण आणि शिक्षक प्रशिक्षण –**

अध्यापनाचा दर्जा सुधारावा म्हणून चार वर्षाची पदवी आणि इतर शिक्षक पात्रता परीक्षा नव्या धोरणात सुचविण्यात आली आहे. तसेच शिक्षकांचा प्रशासकीय भार हलका व्हावा म्हणून या पुढे सेन्सेस जनगणना अथवा निवडणुकीसाठी शिक्षकांची मदत घेतली जाणार नाही असे म्हटले आहे हे फार योग्य निर्णय आहेत. तरीही शिक्षकांना कर्तव्याचे भान देणे, आपण देशाचा आधारस्तंभ घडवत आहोत म्हणजे आपली जबाबदारी किती मोठी आहे याची जाणीव होणे, तितकेच गरजेचे आहे. आपल्या देशात एतदेशियांनी ज्या शाळा सुरू केल्या त्या शाळांमधले शिक्षण निश्चित दर्जेदार होते. तेव्हाचे सातवी पास शिक्षक आताच्या पीएचडी प्राप्त प्राध्यापकांपेक्षा निश्चितच सरस होते. तशा प्रकारचे शिक्षक तयार करण्याचा प्रयत्न नव्या प्रणालीत व्हावा. विशेषता म. ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी महाराष्ट्रात केलेले शिक्षणाचे कार्य अजोड आहे. फुले दाम्पत्याने तत्कालीन मुलींच्या शिक्षणासाठी, अस्पृश्य मुला- मुलींच्या शिक्षणाची गरज ओळखून शाळा सुरू केल्या. या शाळांमधील विद्यार्थ्यांचा निकाल सरकारी शाळांपेक्षा उत्कृष्ट असायचा. अशा बातम्या तत्कालीन ज्ञानोदय, विविध ज्ञानविस्तार अशा नियतकालिकांमधून येत. सावित्रीबाई फुले यांनी तर आपल्या शाळांसाठी स्वतःचा अभ्यासक्रम तयार केला. मुलींना शिक्षणाची ओढ लागावी म्हणून हसत खेळत शिकवण्यासाठी स्वतः गाणी रचली. 'शाळेत जाऊ चला मुलींनो शाळेत जाऊ चला' किंवा 'शिक्षणाने पशुत्व हटते मनुष्यत्व येते पहा, सारखे गाणे लिहून पालकांचे, विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले. वंचितांच्या, दीन दुबळयांच्या घरची मुले शाळेत आली नाही तर सावित्रीबाई त्यांच्या घरी जाऊन चौकशी करायच्या. अध्यापनातील ही तळमळ, कळकळ आजच्या शिक्षकांमध्ये निर्माण व्हावी. अशा शिक्षकांना घडवण्याचे कार्य या धोरणाद्वारे करावे लागेल. शिक्षक प्रशिक्षण घेतल्यावर त्याला हमखास नोकरीची हमी द्यावी लागेल. तरच बुद्धीवंत या क्षेत्राकडे वळतील.

आपल्याला उज्वल संस्कृतीची परंपरा लाभली आहे असे जरी आपण म्हणत असलो तरी ती खरोखरच उज्वल आहे का याचा विचार निष्पक्षपणे करण्याची गरज आहे. जेथे वर्णव्यवस्थेनुसार शिक्षण अशी व्यवस्था असेल तिथे वंचित, शोषितांचा विचार कसा होणार? नवे शिक्षण धोरण हे प्रामुख्याने तळागाळातील मागास समूहाचा विचार करणारे आहे. एकाच वर्गाची प्रगती म्हणजे राष्ट्राची प्रगती नव्हे हे

एव्हाना राज्यकर्त्यांना कळले आहे. युनेस्कोच्या कार्यालयात दर्शनी ठिकाणी एक वाक्य कोरले आहे ते असे आहे की, 'जगातल्या कोणत्याही कोपऱ्यात बसलेला भुकेला व्यक्ती संपूर्ण जगासाठी धोकादायक ठरू शकतो.' हे महत्त्वपूर्ण विधान प्रत्येक देशातल्या प्रत्येक सत्ताधाऱ्यांनी लक्षात ठेवणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे आपल्या देशात प्लास्टिक सर्जरी, विमानाचा शोध, टेस्ट ट्यूब बेबी असे प्रगत सायन्स अगोदरपासूनच होते असे पुराणकथांच्या आधारे म्हटले जाते. नव्या शैक्षणिक धोरणात हे छद्मविज्ञान मुलांना शिकवले जाऊ नये. विद्यार्थ्यांना वास्तवाची, सत्यतेची जाणीव करून देणारे शिक्षणच दिले गेले पाहिजे.

प्राचीनकाळी शिक्षण हे धर्ममुलक होते. आज शिक्षण हे अर्थमूलक झाले आहे. धर्म ज्ञान किंवा धार्मिकताही त्या व्यक्तीची वैयक्तिक बाब मानली जाते. व्यक्तिला अर्थ प्राप्ती करून देणारे, त्याच्या उदरनिर्वाहाचे साधन होणारे शिक्षण त्याला मिळावे ही अपेक्षा शिक्षणाकडून केली जाते. नव्या शैक्षणिक धोरणात हा विचार केलेला दिसून येतो.

**मातृभाषेतून शिक्षण -**

पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक शाळेतले शिक्षण हे विद्यार्थ्यांना मातृभाषेतून दिले जावे असे ही या धोरणात म्हटले गेले आहे; कारण मातृभाषेत कुठल्याही संकल्पना चांगल्या प्रकारे समजून घेता येतात. शिक्षण मातृभाषेतून देताना भाषेच्या अध्ययनासाठी भाषा विषय अपरिहार्य असतो. अगदी मुळाक्षरापासून, जोडाक्षरांपर्यंत व्याकरण शिकवताना धडे आणि कवितेच्या माध्यमातून ते शिकवले जाते. या पाठ आणि कविताद्वारे बालकांवर संस्कार करण्याच्या निमित्ताने आपल्या संस्कृती परंपरेची ओळख करून देण्याच्या निमित्ताने पुराण कथांमधील चमत्कारिक गोष्टी, विषमतेची जोपासणा असणारे, अंधश्रद्धा पसरवणारे अध्ययन नसावे.

एकूणच नवे शैक्षणिक धोरण आणि संस्कृती, परंपरांची सांगड घालताना या बाबींचा विचार होण्याची गरज आहे.

**संदर्भ सूची -**

१. शिक्षण क्षेत्रात नवे बदल नवे वारे - डॉ.विजय पांढरीपांडे.
२. सैद्धांतिक विज्ञानवादी विचार - डॉ. हेमंत अभ्यंकर.
३. विद्यार्थ्यांचे हित जपणारे शिक्षण - डॉ. अभय वाघ.
४. महाराष्ट्र टाइम्स -२५ जुलै २०२१, मराठी माध्यमातून अभियांत्रिकी.
५. https://maharashtratimes.com
६. https://www.orfonline.org